Impact Factor – 6.261 Special Issue - 109 Feb. 2019 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

**Multidisciplinary International E-research Journal**

Two Days Interdisciplinary International Conference on

# Role of Social Reformers in Nation Building

Organized by

Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's

**Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda**

( 'B' Grade NAAC Accredited )

Sponsored by

**K.B.C. North Maharashtra University, Jalgaon**



- EDITOR -

**Prin. Dr. Sambhaji N. Desai**

- CHIEF EDITOR -

**Mr. Dhanraj T. Dhangar**

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Printed By : **PRASHANT PUBLICATIONS, JALGAON**

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीविषयी विचार<br>- प्रा. रमेश एकनाथ भारूडकर | |
| 22 | राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीमुक्ती चळवळीतील योगदान<br>- डॉ. तात्याराम परमेश्वर सोंडगे<br>- प्राचार्य डॉ. दादासाहेब उ. मोटे | |
| 23 | स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेसंबंधी समाज सुधारकांचे विचार<br>- प्रा. पोकळे एस.एम.<br>- प्रा.डॉ. शिनगारे व्हि.सी. | |
| 24 | समाजसुधारकांचे समाज सुधारणेमधील योगदान<br>- डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर | |
| 25 | भारतीय स्त्रियांचे उध्दारक – डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>- प्रा.डॉ. विद्या खंडारे-गोवंदे | |
| 26 | पाश्चात्य विचारसरणीचा महाराष्ट्रीयन समाज सुधारकांवरील प्रभाव<br>- प्रा.डॉ. डिगोळे बी.व्ही. | 9 |
| 27 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादी जाणिवा एक शोध<br>- डॉ. राजीव यशवंते | 9 |
| 28 | खेळ व सामाजिक विकास : सहसंबंध<br>- डॉ. शिवानंद भरत पाटील | 9 |
| 29 | अण्णाभाऊ साठे यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान<br>- सौ. भाग्यश्री अमोल लेंढे | 10 |
| 30 | शाहू महाराज आणि समाज सुधारणा चळवळ<br>- प्रा.डॉ. मधुकर आत्माराम देसले | 10 |
| 31 | समाज विकासात समाजसुधारक म्हणून राजाराम मोहन रॉय यांचे योगदान<br>- प्रा. दत्तात्रय प्रभूराव मुंढे | 10 |
| 32 | कबीर का समाजसुधारक रूप<br>- प्रा. दिलीप पी. पाटील | 11 |
| 33 | कामगारांचे उध्दारक : नारायण मेघाजी लोखंडे<br>- प्रा. दिलीप भिमराव गिऱ्हे<br>- डॉ. विपीन राठोड | 11 |
| 34 | स्त्री शिक्षण – समाजसुधारक महर्षी कर्वे<br>- प्रा.डॉ. आशालता के. जावळे | 11 |
| 35 | ग्रामसुधारणांसाठी महात्मा गांधीजींच्या विचारांची २१ व्या शतकातील अनिवार्यता : एक अध्ययन<br>- प्रा.डॉ. नितीन रामदास बडगुजर | 117 |
| 36 | विवेकी राय के निबन्धों की गँवई गंध गुलाब<br>- डॉ. राजेश भामरे | 120 |
| 37 | लोकसाहित्यातील सामाजिकता<br>- डॉ. शकुंतला एम. भारंबे | 123 |
| 38 | साहित्य आणि समाज<br>- प्रा.डॉ. भारती अ. बेंडाळे | 125 |
| 39 | डॉ. गिरिराजशरण अग्रवाल की गज़लों में आस्था और आशा की प्रेरणा<br>- प्रा.डॉ. भारती बी. वळवी | 127 |
| 40 | आदोर काव्यसंग्रहातुन आदिवासीच्या जीवंत जाणीवांचे वर्णन<br>- डॉ. किशोर आर. पाठक | 130 |
| 41 | पं. श्रीधरशास्त्रींची स्त्री सुधारणावादी भुमिका<br>- डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर | 132 |




Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143 RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
February 2019 Impact Factor (SJIF) - 6.261 Special Issue 109 ... of Social Reformers ...

18 · 19

# पं. श्रीधरशास्त्रींची स्त्री सुधारणावादी भूमिका

– डॉ. रावसाहेब थिपराव नेरकर
इतिहास विभाग
राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा जि जळगांव

Rani Laxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist Jalgaon

**प्रस्तावना :–**

स्त्रियांच्या सबलीकरणात 'शिक्षणाची' भूमिका महत्त्वपूर्ण आहे. स्त्री साक्षर झाली म्हणजे तिला तिच्या अस्तित्वाची जाणीव होईल. आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून सुटका करण्यासाठी ती सज्ज होईल. अशी धारणा सुधारणावादी विचारसरणीच्या विद्वानांची होती. म्हणूनच समाज सुधारणा चळवळीत स्त्री शिक्षणाला त्यांनी अग्रक्रम दिला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले सारख्या व्यक्ती समाजाचा प्रखर विरोध पत्करुन स्त्री शिक्षणाचे काम हिरिरीने करीत होत्या. सनातनी वर्ग मात्र स्त्रीशिक्षणाच्या कार्यात अडथळे निर्माण करीत होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकारच नाही अशी त्यांची धारणा होती. धर्मशास्त्राचा चूकीचा आधार घेऊन स्त्री शिक्षण धर्मबाह्य कृत्य आहे असा प्रचार सनातनी मंडळी करीत होते. 'स्त्रियांना शिक्षण दिले तर मोठे अनर्थ होतील, घरसंसार उध्वस्त होतील आणि संसारातून त्यांचे मन उडेल अशा भ्रामक कल्पना बाळगणाऱ्यांनी धर्मशास्त्राचे आधार पुढे करुन या काळात अडथळे आणले'.१ धर्मभोळ्या जनतेचा फायदा घेऊन धर्मशास्त्राधाराचा चुकीचा अर्थ लावून स्त्री शिक्षणाला विरोध केला जात होता. कर्मठ विचारसरणीच्या ब्राह्मणांना मुलींना शिक्षण देणे ही कल्पनाच हिंदू समाजाला विलक्षण धक्का देणारी वाटत होती, हे काहीतरी विपरीत घडते आहे असे त्यांचे ठाम मत झाले होते. त्या कारणाने धर्मभावनेला डावलून आणि जनमनाचा कौल झुगारून देऊन मुलीला शाळेत पाठविणे ही गोष्ट अन्यायकारक असल्याचा दावा त्यांनी केला होता'.२.

**पं.श्रीधरशास्त्रींची स्त्री साक्षरतेविषयी भूमिका –**

सनातनी वर्गाचा स्त्रीशिक्षणाला असलेला विरोध मोडून काढण्यासाठी पं. श्रीधरशास्त्रींनी धर्मशास्त्रीय आधार दिले. स्त्रीशिक्षणात धर्मशास्त्रीय मान्यता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पं. श्रीधरशास्त्रींचे शिष्य गो.नी. दांडेकरांनी आपल्या 'स्मरणगाथा' या पुस्तकात शास्त्रीजींच्या आठवणी नमूद केलेल्या आहेत. उपनिषदाचे अध्यापन करताना एका ठिकाणी गर्भोत्पत्तीचा विषय आला.

*'पुरूषे ह वा अयमादितो गर्भो भवति !'*

हे चैतन्य पुरूषामध्ये गर्भरूपाने असतं. तो त्याचे स्त्रीमध्ये सिंचन करतो, आणि ती त्याची धारणा करते. तो चैतन्याचा प्रथम जन्म.

आम्ही सरधोपट वाचीत गेलो. काका थांबले, डोळे मिटीत, स्मित करीत म्हणाले, 'स्त्रियांना उपनिषदांच्या अध्यायनाचा अधिकार होता याचं प्रबळ प्रमाण इथ आहे'. आश्चर्याने आम्ही त्यांच्याकडे पाहू लागलो. काकांनी म्हटले, 'तिथं खाली टीप दिली आहे, ती वाचा'. मी टीप पाहिली, ती होती

*अपक्रामन्तु गार्भिण्यः ।*

प्रश्नार्थक मुद्रेने काकांकडे पाहू लागलो ते बोलले,

'अभिप्रेत असं आहे की, ज्या गर्भवती स्त्रिया असतील, त्यांनी उठून जावं. गर्भसंभवाचा विचार सुरू आहे म्हणून त्यांनी परत यावं, असाही उल्लेख आहे. जर उपनिषद्‌काळी स्त्रिया या चर्चांना उपस्थित नसत्या, तर हा उल्लेख कशासाठी केला असता?' ३ म्हणजेच स्त्रियांना धर्मशास्त्रांचे अध्ययन करण्याचा, शिक्षण घेण्याचा अधिकार हा शास्त्रसंमत होता. ही बाब स्पष्ट होते. जो अधिकार आपल्या वैदिक संस्कृतीने स्त्रियांना दिलेला होता तो त्यांच्याकडून हिरावून घेणे पूर्णपणे चुकीचे आहे असे शास्त्रीजींचे स्पष्ट मत होते. त्यांनी 'रामदास आणि रामदासी' या मासिकात लिहिलेल्या 'स्त्री समर्थांचा सदाचाराचा विमर्श' या लेखात म्हटले आहे की, 'पतिदेव गुरु स्त्रीणाम्' हे मनुस्मृतीतील वाक्य उपोद्बलक म्हणून दिले आहे. परंतु हे वाक्य स्त्रियांनी विवाहाला उपनयन समजून वेदाध्ययन कर्तव्य असता पतीजवळच वेदाध्ययन करावे इतरांकडे करु नये या अर्थाचे आहे. याचेपूर्वी पूर्वकल्पांत स्त्रियांना उपनयन, वेदाध्ययन, गायत्रीचा दुसऱ्याला उपदेश करण्याचा अधिकार होता. प्रमाण वाक्य – 'पुराकल्पे तु नारीणां मौञ्जीवन्धनमिहाते । अध्यापनंच वेदाना सावित्रीवाचनं तथा ।' पुढे मौंजीची चाल बंद होऊन मुलींच्या विवाहाला मौज समजू लागले. त्यावेळी पतीजवळ वेदाध्ययन करावे अशा अर्थाचे वरील वाक्य आहे. यामुळे स्त्रियांनी केलेल्या नाममंत्राकरिता गुरुत्वाचा निषेध संभवत नाही व तसेच त्यांनी नाममंत्रांचा उपदेश दुसऱ्यास करण्याचा निषेधही संभवत नाही'. ४ म्हणजेच आपण स्त्रीला रूढी आणि परंपरांच्या जोखडात बंदीस्त केले. प्राचीन धर्मशास्त्राने शिक्षण घेण्याचा आणि अध्यापनाचा दिलेला अधिकार आपण हिरावून घेतला. स्त्री शिक्षणास धर्मशास्त्राचा अडसर नसल्याने स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवणे हे धर्मविरोधी कृत्य असल्याचे पं. श्रीधरशास्त्रींचे म्हणणे होते. शिक्षणाच्या क्षेत्रात स्त्री, पुरुष असा कोणताही भेदभाव केला जाऊ नये. त्यांच्या मते, मुलगा व मुलगी यांस कायद्याने सारखे लेखीत जावे. मुलगा व मुलगी या दोहोंसही द्रव्यार्जनास योग्य असे शिक्षण देण्यात यावे'. ५ म्हणजेच स्त्री-पुरुष असा भेद न करता जे त्यांना भावी जीवनात व्यवहारोपयोगी होईल अशा शिक्षणाचा लाभ प्रत्येकाला घेऊ द्यावा अशी भूमिका श्रीधरशास्त्रींची स्त्रीशिक्षणाविषयी होती. आपल्या विविधांगी लिखाणातून आणि वक्तृत्वातून त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. सनातनी मंडळींचे स्त्री-शिक्षण विरोधी विचार खोडून काढून स्त्री शिक्षणाला धर्मशास्त्रीय आधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'प्राचीन काळातील स्त्रिया अध्ययनाप्रमाणेच अध्यापनाचेही काम करीत असत व समाज त्यांना 'उपाध्याय' म्हणून ओळखीत असे. उच्च प्रकारच्या शिक्षणाच्या शास्त्रांमध्ये पुरूषांप्रमाणेच त्या वेळच्या स्त्रियाही वेद, ब्राह्मणे व उपनिषदे यांचे अध्ययन करीत असत. मुंडक उपनिषदात (१.१.५) उल्लेखल्या



Self Attested